# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्रं. 324/2023  दिनांक : 22.08.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**विमानतळ :–**दिनांक 20.08.2023 रोजी चे 15.30 वा. चे सुमारास, **आनंदनगर ते विद्युतनगर जाणारा रोड कंधारची खिचडी हॉटेल समोर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस तुझे चुलत भावाने माझा मित्र सदाशिव देशमुख यास ठार मारले तेंव्हा तु तुझ्या चुलत भावास मदत का केलास असे म्हणुन शिवीगाळ करून यातील आरोपीने फिर्यादीचे मोटार सायकलला लाथ मारून खाली पाडुन दुसऱ्या आरोपीने दाबुन धरले व खंजरने डोक्यात मारून गंभीर दुखापत करून खुन करण्याचा प्रयत्न केले. फिर्यादीचे मित्रास थापडा बुक्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शुभम राजुसिंह सुर्यवंशी, वय 23 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. समर्थनगर नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन **291/2023 कलम** 307, 326, 324, 323, 504, 506, 34 भादवि सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री दोनकलवार, मो. नं. 7775001444** हे करीत आहेत.

## 2)जिप चोरी :–

**1)सिंदखेड :–** दिनांक 19.08.2023 रोजी चे 02.45 वा. चे सुमारास, **वाई बाजार येथील कॉम्पलेक्स जवळुन ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची बोलेरो पिकअप कंपणीची जिप क्रमांक एमएच–30/एबी–3979 किंमती 4,00,000/–रूपयाची ही सचिन शेषेराव राठोड, रा. वसराम तांडा यांचे वाई बाजार येथील कॉम्पलेक्स जवळुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी आकाश सुरेश राऊत, वय 25 वर्षे, व्यवसाय गुत्तेदार, रा. येनोरा पोस्ट चिंचोली ता. हिंगणघाट जि. वर्धा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं 85/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2471 कुमरे, मो. क्रं. 7744002471** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**मुखेड :–** दिनांक 02.03.2008 च्या नंतर तीन वर्षापासुन ते आज पावेतो, **फिर्यादीचे सासरी मौ. मंग्याळ ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस ट्रॅक्टरचे हप्ते भरण्यासाठी एक लाख रूपये तुझे माहेरहुन घेवुन ये नाहीतर तुला घरात राहुदेत नाही असे म्हणुन मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 31 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 242/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री राठोड, मो.क्रं. 9075991793** हे करीत आहेत.

## 4)खंडणी :–

**नायगांव :–**दिनांक 12.08.2023 रोजी चे 13.30 ते 14.30 वा. चे दरम्यान, **सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय समोर रोडवर नायगाव ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीचे मौ. सुजलेगाव येथील जमिनीवर मा. तहसीलदार नायगाव यांनी आरोपीने दिलेल्या तक्रारी अर्जावरून बोजा चढविला असुन तो बोजा काढुन घेण्याकरीता दोन लाख रूपयाची खंडणीची मागणी केली. जर मला दोन लाख रूपये खंडणी नाही दिले तर तुझी जमीन जप्त करायला लावतो व तुला जेलमध्ये टाकायला लागतो असे म्हणुन खंडणीची मागणी केली. वगैरे **फिर्यादी सुभाष गंगाराम नव्हारे, वय 49 वर्षे, रा. सुजलेगाव ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगांव** गुरनं 125/2023 कलम 385, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बाचावार, मो.क्र. 9637320355** हे करीत आहेत.

## 5)प्रोव्हिबीशन :–

**1)मुखेड :–** दिनांक 21.08.2023 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **नरसी ते मुखेड जाणारे रोडवर तडका धाब्यामध्ये ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 2250/–रुपयाचा मुद्येमाल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गोविंद संभाजी मुंडे,. ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 243/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2336 चिंचोरे, मो.नं. 9923192636** हे करीत आहेत.

**2)अर्धापुर :–** दिनांक 21.08.2023 रोजी चे 11.00 वा. चे सुमारास, **पेट्रोलपंपाचे बाजुस विजय धाब्याच्या पाठीमागे मोकळया जागेत पिंपळगाव शिवार ता. अर्धापुर जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू किंमती 1260/–रुपयाचा मुद्येमाल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2470 कल्याण रत्नाकर पांडे, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 312/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/134 घोरपडे, मो.नं. 8806500054** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड